
# राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण

डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे



Scanned with CamScanner

सहभाग वाढला होता. राज्यशास्त्रज्ञांसमोर हे नवे आव्हान उभे राहिले होते. युद्धोत्तरकालीन राज्यशास्त्रीय संशोधनांचा जास्तीत जास्त भर निवडणूक अभ्यासांवर आणि जनसहभागाच्या प्रश्नांवर आहे हा केवळ योगायोग नव्हे, असे ब्लॉन्डेलचे मत आहे. पहाणीपद्धतीसारखी नवी तंत्रेही या कामी प्रेरक ठरली. निवडणूक अभ्यासांमध्ये सहभागी होणाऱ्यांना आपण राज्यशास्त्राच्या मन्वंतराचे शिल्पकार आहोत असा आभास काही काळ झाला.

नव्या प्रवाहाच्या टीकाकारांना मात्र ज्या झपाट्याने त्याचा विस्तार झाला तो पाहिल्यावर असे वाटते की केवळ राजकीय सिद्धान्ताच्या जुन्या दृष्टिकोनात त्रुटी किंवा अपप्रवृत्ती होत्या आणि म्हणून नव्या ''शास्त्रीय'' ''तथ्याधिष्ठित'' विश्लेषणाची गरज निर्माण झाली होती. ही स्पष्टीकरणे बरोबर असली तरी पुरेशी ठरणारी मुळीच नाहीत. अत्यंत तोकड्या क्षेत्राची निवड, तुकड्यातुकड्यांनी केला जाणारा विचार, आणि सर्वसाधारण सिद्धान्तावरील अविश्वास ही या 'नव्या' शास्त्राची वैशिष्ट्ये असल्यामुळे संपूर्ण समाजाचे स्वरूप मूलतः कसे आहे ? आणि त्यात होणाऱ्या बदलांची दिशा कोणती आहे ? अशा प्रश्नांना फाटा देण्यात, त्याचप्रमाणे व्यापक परिवर्तनाचे प्रश्न डावलण्यात हे 'नवे शास्त्र' अत्यंत साह्यभूत ठरले होते.

''विद्यमान समाजव्यवस्था मूलतः एकंदरीत निरोगी व निकोप आहे. तिचे प्रश्न केवळ तपशीलांच्या पातळीवरचे आणि केवळ 'विस्कळीतपणा' चे आहेत. भांडवलदारी समाजाच्या अंगभूत अविवेकाशी प्रश्नांचा मुळीच संबंध नाही. त्यांची कारणे वेगळीच व तात्कालिक आहेत. प्रासंगिक व वरवरच्या विकृतींमधून ते प्रश्न उद्‌भवलेले आहेत'' अशी धारणा नव्या राज्यशास्त्राचे प्रवर्तक बाळगतात. 'वस्तुनिष्ठता' व 'संशोधन पद्धती' यांचे अवास्तव स्तोम करणारे हे राज्यशास्त्रज्ञ प्रत्यक्षात अत्यंत दुय्यम-तिय्यम महत्त्व असलेल्या प्रश्नांवरच वेळ, पैसा व शक्ती वाया घालवतात, असा टीकाकारांचा अभिप्राय आहे. कॉबनच्या शब्दात सांगायचे तर ''आज आपण ज्याला **राजकीय शास्त्र** (पॉलिटिकल सायन्स) असे म्हणतो ते बव्हंशी विद्यापीठ प्राध्यापकांनी शोधून काढलेले पलायनाचे साधन आहे. त्याच्या साह्याने ते राजकारण (पॉलिटिक्स) नावाचा भयंकर विषय सोयीस्करपणे टाळू शकले; 'शास्त्र' साध्य करणे मात्र त्यांना कधी जमलेच नाही.''

'राजकीय विश्लेषण' या नव्या शास्त्राच्या समर्थकांचे व टीकाकारांचे दृष्टिकोन आपण नोंदवले आहेत. यापैकी कोणाचे म्हणणे वस्तुस्थितीला धरून आहे हे ठरवण्यापूर्वी राजकीय विश्लेषण म्हणजे काय आणि त्यात कोणकोणत्या विविध प्रवाहांचा समावेश होतो हे पहाणे आवश्यक आहे.

**राजकीय विश्लेषण म्हणजे काय ?**

'राजकीय सिद्धान्त' वादी दृष्टिकोन ''संकुचित'' होता, कारण तो राज्यशास्त्राच्या अध्ययनकक्षा समाजातील राजकीय व शासकीय उपव्यवस्थापुरत्याच सीमित मानीत असे. 'राजकीय विश्लेषण' वादी दृष्टिकोन राज्यशास्त्राचा विचार व्यापक प्रमाणावर करतो. समाजातील

नियंत्रणाचा आणि त्या नियंत्रणाची सूत्रे हाती घेण्यासाठी समाजात चाललेल्या स्पर्धेतील प्रत्येक सहभागी घटकाच्या क्रियाकलापांचा अभ्यास राजकीय विश्लेषणात येतो.

'राजकीय सिद्धान्त'वादी राज्यशास्त्रज्ञांचा भर वर्णनपर लेखनावर होता. कोटेकोर वर्णन ही अत्यावश्यक बाब आहे असे 'विश्लेषण' वादीही मानतात. पण त्यांच्या मते ती केवळ पहिली पायरी असते; तिथेच न थांबता अधिक परिष्कृत (रिफाइन्ड) व प्रकृष्ट (सॉफिस्टिकेटेड) तंत्राचा अवलंब करून विश्लेषण करणे अधिक महत्त्वाचे असते. याचा अर्थ असा की 'विश्लेषण'वादी राज्यशास्त्रज्ञांना राजकीय तत्त्वज्ञान, राजकीय विचार व राजकीय सिद्धान्त यांचे रूपांतर राजकीय शास्त्रात करायचे होते. विषय, व्याप्ती व प्रामाण्य-निकष या तिन्ही बाबतीत 'राजकीय सिद्धान्ता'पेक्षा 'राजकीय विश्लेषणा'चा आशय भिन्न आहे. विषयाच्या दृष्टीने पाहता राजकीय सिद्धान्तात तथ्यांइतकेच महत्त्व आदर्शांना, साध्यांइतकेच साधनांना दिलेले असायचे; राजकीय विश्लेषणाचा भर फक्त तथ्यांवर व साधनांवर होता.. राजकीय सिद्धान्ताची व्याप्ती अतिसमावेशक होती, तर राजकीय विश्लेषणाच्या अभ्यासविषयांच्या व्याप्तीत विशिष्टता व नेमकेपणा होता. उदा. मार्क्स संपूर्ण ऐतिहासिक प्रक्रियेत राज्याचे स्वरूप व भूमिका तपासतो, तर वर्तनलक्षी राज्यशास्त्रज्ञ एका निवडणुकीतील मतदारवर्तन एवढाच विषय विश्लेषणार्थ हाती घेतो. प्रामाण्याचे निकषही वेगळे आहेत. ''पुराव्याने विधिग्राह्य (व्हॅलिड) ठरेल तेवढेच शास्त्र आणि जे असे विधिग्राह्य ठरवणे शक्य नसते ते तत्त्वज्ञान'' अशा शब्दात एक्सटाइनने हा फरक स्पष्ट केला आहे.

राजकीय विश्लेषणवाद्यांची भूमिका राजकीय तत्त्वज्ञानाला विशेष प्रतिकूल होती. त्यांच्या मते तत्त्वज्ञान केवळ संकल्पनात्मक असते. ते फक्त चिकित्सात्मक व स्पष्टीकरणात्मक शोध घेऊ शकते, मुळाला स्पर्श करू शकत नाही. स्वरूपतःच तत्त्वज्ञान म्हणजे 'दुय्यम स्तरीय अध्ययन' (सेकंड ऑर्डर स्टडी) असल्यामुळे 'प्रथम स्तरीय' प्रश्नांबद्दल म्हणजे भौतिक-ऐहिक जगाच्या प्रश्नांबद्दल ते काहीच सांगू शकत नाही. तत्त्वज्ञान फक्त संकल्पनांचा अभ्यास करते. त्या संकल्पना ज्या तथ्यांना, घटितांना वा प्रसंगांना लागू केल्या जातात किंवा केल्या जाऊ शकतात त्यांचा ते अभ्यास करीत नाही. म्हणून राजकीय तत्त्वज्ञानही फक्त राजकीय संकल्पनाच अभ्यासते, राजकीय वादप्रश्नांविषयी (इश्यूज) चूक-अचूक असे काहीच ते सांगू शकत नाही. राजकीय विश्लेषणच ते कार्य करू शकते.

**रॉबर्ट डहाल याचे विचार :**

राजकीय विश्लेषणवादी दृष्टिकोनाचा रॉबर्ट डहाल हा एक प्रवर्तक आहे. या दृष्टिकोनाचे प्रयोजन व स्वरूप यासंबंधी त्याच्या विचारांचा आपण आता परिचय करून घेऊ.

तो म्हणतो, राजकारण ही मानवी अस्तित्वाची एक अटळ वस्तुस्थिती आहे. राज्यव्यवस्थेशी प्रत्येक व्यक्तीचा संबंध येतोच. राजकारणाचे बरेवाईट परिणाम प्रत्येक व्यक्तीवर होतच असतात. त्यामुळेच राजकीय विश्लेषण करणे निकडीचे ठरते. काही लोक असे मानतात की राजकारणाचा

अभ्यास विशुद्ध तत्त्वज्ञानपूर्वक आणि विशुद्ध चिंतनाच्या मार्गाने केला जाऊ शकतो. पण ते पुरे नाही. विशुद्ध चिंतनासाठी इतर अनेक क्षेत्रे मोकळी आहेत. राजकारणाचे विश्लेषण करण्याचे कौशल्य वापरूनच राजकारणाचे यथार्थ आकलन शक्य होते. आपण ज्या जगात जगतो ते जग समजावून घेण्यास राजकीय विश्लेषणाची मदत होते; व्यक्तीसमोर वेगवेगळे जे पर्याय उभे राहतात त्यांच्यामधून योग्य त्या पर्यायाची निवड करणे जिथे आता विश्लेषणामुळे शक्य होते; आणि सर्व राज्य-व्यवस्थांमध्ये अंगभूत असलेल्या परिवर्तन-प्रक्रियेवर आपला प्रभाव टाकणे शक्य होते. काळजीपूर्वक आपली धोरणे ठरवणे आणि त्यांच्यापैकी शक्य होतील तेवढी धोरणे कमीत कमी किंमत मोजून व्यवहारात वापरून घेणे यालाच राजकारणात हुशारीने वागणे असे म्हणतात. राजकीय विश्लेषणाच्या मदतीने हे शक्य होते.

**राजकीय विश्लेषणाचे प्रकार :**

रॉबर्ट डहाल यांनी राजकीय विश्लेषणाचे पुढील चार प्रकार सांगितले आहेत. कोणत्याही प्रश्नाकडे पाहण्याच्या या विविध अभिमुखतांच्या (ओरिएन्टेशन) आधारे तो हे प्रकार पाडतो.

(१) अनुभववादी (इंपिरिकल) विश्लेषण

(२) आदर्शात्मक (नॉर्मेटिव्ह) विश्लेषण

(३) धोरणात्मक (पॉलिसी) विश्लेषण

(४) शब्दार्थसंबंधात्मक (सेमँटिक) विश्लेषण

**(१) अनुभववादी विश्लेषण :** नैसर्गिक शास्त्रांमध्ये प्रचलित असलेली ही विश्लेषण पद्धती सामाजिक आणि वर्तनवादी शास्त्रांसाठीही उपयुक्त आहे. आपल्या अभ्यासक्षेत्रातील घडामोडींचे वर्णन, स्पष्टीकरण व भविष्यकथन शास्त्रज्ञ करतात. विविध घडामोडी, वस्तू आणि व्यक्ती यांच्यातील संख्याशास्त्रीय, संभाव्यतात्मक, कार्यात्मक आणि कार्यकारणात्मक संबंधाचा शोध घेऊन त्यांचे वर्णन ते करतात. शास्त्रज्ञ नव्हे तर सामान्य माणसेही भोवतालच्या जगाचे ज्ञान अनुभववादी पद्धतीनेच मिळवतात. नवनवी निरीक्षणे, आकलने, प्रयोग आणि विवेचने (इंटरप्रिटेशन्स) यांच्या प्रकाशात आधीच्या अनुभवाधिष्ठित ज्ञानात बदल होत जातात आणि भर पडत असते. प्रश्नाची जुनी उत्तरे त्याज्य ठरवली जातात व नवी स्वीकारली जातात. याचा अर्थ असा की अमुक एका प्रश्नाचे जे उत्तर आपण आज ग्राह्य मानतो ते चुकीचेही असू शकते हे अनुभववादी विश्लेषणात नेहमीच गृहीत धरलेले असते.

असे अनुभववादी विश्लेषण कितपत शास्त्रीय मानता येईल ? या प्रश्नावर मतभेद आहेत. काही अभ्यासकांच्या मते मानवी वर्तनाचा काटेकोर व परिपूर्ण असा शास्त्रीय अभ्यास केलाच जाऊ शकत नाही. पण विश्लेषणवादी अभ्यासक मात्र असे मानतात की परिश्रमपूर्वक केलेल्या निरीक्षण, वर्गीकरण व मापन यांच्या आधारे आपले निष्कर्ष व सिद्धांत यांना पडताळा देणे हे कार्य शास्त्रीय असून त्याद्वारे मानवी वर्तनाचा अभ्यास केला जाऊ शकतो. तो परिपूर्ण नसेलही पण राजकीय जीवनात ठळकपणे असलेली अनिश्चितता पद्धतशीर राजकीय विश्लेषणाद्वारे काही अंशाने तरी कमी होऊ शकते.

Scanned with CamScanner

**(२) आदर्शात्मक विश्लेषण :** धर्म व तत्त्वज्ञान या क्षेत्राचे व्यवच्छेदक असलेले आणि नीतिशास्त्र व राजकीय तत्त्वज्ञानाच्याही क्षेत्रात प्रचलित असलेले हे विश्लेषण आहे. काही गोष्टी अन्य काही गोष्टींपेक्षा चांगल्या आहेत हे गृहीत आपल्या सर्वच कृतींमागे व विश्वासांच्या मुळाशी असते. ''चांगले'' किंवा ''अधिक चांगले'' याचा नेमका अर्थ काय ? ते ठरवण्याचा एकच एक सर्वोत्तम निकष सर्व बाबतीत असतो का ? तसा जर नसेल तर विविध क्षेत्रांतील 'चांगलेपणा'चा परस्परांशी काय संबंध असतो ? चांगलेपणाचे निकष कोणत्या आधारावर निवडायचे ? एखाद्या गोष्टीच्या चांगलेपणाबद्दलचा आपला निर्णय वस्तुनिष्ठ किती आणि व्यक्तिनिष्ठ किती ? या प्रश्नांची उत्तरे जेव्हा विशिष्ट अभ्यासविषयाच्या संदर्भात शोधली जातात तेव्हा ते विश्लेषण आदर्शात्मक ठरते.

**(३) धोरणात्मक विश्लेषण :** सध्याची वस्तुस्थिती आणि तिच्यापेक्षा संभवतः अधिक चांगली असू शकणारी भविष्यकालीन वस्तुस्थिती यांना जोडणारा दुवा धोरणात्मक विश्लेषणाचा असतो. दैनंदिन जीवनातही विशिष्ट बाबतीत असमाधानी असलेले आपण अधिक समाधान मिळवण्याच्या दिशेने जाण्याचे मार्ग शोधीतच असतो. शासनात आणि अन्य संघटनांतसुद्धा जे धोरणनिर्माते असतात ते व त्यांचा कर्मचारीवृंद पद्धतशीर धोरणात्मक विश्लेषण करीत असतात. मात्र एक पद्धतशीर बौद्धिक कृती म्हणून धोरणात्मक विश्लेषणाचा अवलंब आधीच्या दोन प्रकारांपेक्षा खूपच अलीकडे होऊ लागला.

सर्व पर्यायांचा व त्यांच्या परिणामांचा विचार करणे हा धोरण-विश्लेषणाचा गाभा असतो. एखाद्या धोरणाची स्वीकार्यता दोन गोष्टींवरून ठरते - एक, समोर असलेली ध्येये; आणि दुसरी, परिस्थितीचे विशिष्ट स्वरूप.

**(४) शब्दार्थमीमांसात्मक विश्लेषण :** या विश्लेषणात संशोधनविषयातील मध्यवर्ती संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्यामुळे त्यास संकल्पनात्मक विश्लेषण असेही म्हटले जाते. अर्थाचे हे स्पष्टीकरण राजकीय विश्लेषणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते कारण त्यात वापरात येणाऱ्या कळीच्या संकल्पनांच्या व्याख्यांविषयी सर्वमान्यता बहुधा नसतेच. उदाहरणार्थ लोकशाही, स्वातंत्र्य, क्रांती, बलप्रयोग, सत्ता, समता इत्यादी संज्ञा कमालीच्या संदिग्ध आहेत. व्यावसायिक राज्यशास्त्रज्ञ व राजकीय तत्त्वज्ञसुद्धा त्यांचा वापर विभिन्न अर्थांनी करीत असतात. हे विविध अर्थ स्पष्ट करण्याचे किंवा एकच विशिष्ट अर्थ निर्धारित करण्याचे प्रयत्न सर्वमान्यता मिळवण्याइतपत सफल झालेले नाहीत.

राजकीय विश्लेषण धोरणात्मक असो, आदर्शात्मक असो की अनुभववादी असो प्राथमिक संज्ञांच्या अर्थाविषयी बरीचशी एकवाक्यता असल्याखेरीज अभ्यासक पुढे जाऊच शकणार नाही. काही वेळा मात्र काही संज्ञांची व्याख्या करणेच शक्य होत नाही. तर काही वेळा व्याख्या केली तरी ती सर्वमान्य होऊ शकत नाही. अशावेळी नाममात्र (नॉमिनल) व्याख्या करून त्या अर्थाने विशिष्ट संशोधनात ती संज्ञा वा संकल्पना वापरीत असल्याचे संशोधक जाहीर करतो.

एक गोष्ट मात्र खरी आहे की संज्ञा/संकल्पनांचे अर्थ जितके स्पष्ट असतील तितके राजकारण या क्लिष्ट व संदिग्ध विषयाचे आकलनही स्पष्ट होऊ शकते. शब्दार्थमीमांसात्मक विश्लेषण वरील तिन्ही विश्लेषणांतील विधाने समजण्याच्या दृष्टीने उपयुक्त असले तरी ते त्या तिन्ही विश्लेषणांना पर्यायी मात्र कधीच ठरू शकत नाही.

**या विश्लेषणांचे परस्परांशी संबंध :**

काही वेळा असे म्हटले जाते की 'काय आहे' हे जाणण्यासाठी अनुभववादी विश्लेषणाचा तर 'काय असावे' हे जाणण्यासाठी धोरणात्मक विश्लेषणाचा उपयोग केला जातो. हे विधान तसे बरोबरच आहे. मात्र प्रत्येक प्रकारचे विश्लेषण ज्या ज्ञानाचा शोध घेते ते उरलेल्या प्रकारांपासून पूर्णतया स्वतंत्र असते. असा जर याचा कोणी अर्थ घेतला तर ते चूक ठरेल. धोरणात्मक विश्लेषणासाठी 'काय आहे' आणि 'काय असावे' या दोहोंची जाण आवश्यक असते. अनुभवसिद्ध व आदर्शात्मक अशा दोहोंच्या ठोस गृहीतकांवर आधारित उभारणी धोरणात्मक विश्लेषणात केली जाते. तसे नसल्यास चुकीच्या गृहीतावर आधारित असल्यामुळे ते धोरण वाईट धोरण ठरेल.

धोरणात्मक विश्लेषणात साध्ये व साधने या दोहोंचा विचार होतो; मात्र आदर्शात्मक विश्लेषण फक्त साध्यांचाच, तर अनुभववादी विश्लेषण फक्त साधनांचाच विचार करते; असे मानले जाते. पण ते बरोबर नाही कारण अनुभवसिद्ध धोरणांचा आधार असल्याखेरीज आदर्शवादी विश्लेषण शक्यच होणार नाही.

निष्कर्षाच्या स्वरूपात रॉबर्ट डहाल असे म्हणतो की, धोरणात्मक विश्लेषणासाठी आदर्शात्मक व अनुभववादी या दोन्ही विश्लेषणांची गरज असते. आदर्शात्मक विश्लेषणाला या ना त्या प्रकारचे अनुभवसिद्ध विश्वास आवश्यक असतात; अनुभववादी विश्लेषण मात्र धोरणात्मक वा आदर्शात्मक विश्लेषणाखेरीजही केले जाऊ शकते. कारण अनुभववादी विश्लेषणाद्वारे जे वस्तुनिष्ठ ज्ञान सामाजिक (आणि इतर कोणत्याही) शास्त्राच्या अभ्यासकाला शोधायचे असते ते चांगलेपणा किंवा वाईटपणा यांच्या प्रमाणकांपासून स्वतंत्र असते. शास्त्रज्ञ फक्त काय आहे ते शोधीत असतो, आणि त्याचे वर्णन करीत असतो.

अर्थात यातून असे विवाद्य प्रश्न उभे राहतात की जड वस्तुमात्राचा अभ्यास करणाऱ्या नैसर्गिक शास्त्रांना जसे वस्तुनिष्ठ ज्ञान गोळा करणे शक्य असते तसे मानव प्राण्यांचा अभ्यास करणाऱ्या सामाजिक आणि वर्तनवादी शास्त्रांना शक्य होईल काय ? आणि जरी शक्य झाले तरी मूल्यांचा संदर्भ न घेता नुसतेच अनुभवसिद्ध ज्ञान गोळा करणे कितपत इष्ट होईल ? या प्रश्नांवर गेल्या काही वर्षांपासून तीव्र वादंग राज्यशास्त्राच्या क्षेत्रात सुरू आहेत. काहींना असे वाटते की अनुभववादी विश्लेषण आदर्शात्मक वा धोरणात्मक विश्लेषणाखेरीज केले जाऊ शकते ते तात्त्विक पातळीवर जरी खरे असले तरी प्रत्यक्षात मात्र त्या तिन्ही अभिमुखता (ओरिएन्टेशन्स) एकमेकात मिसळलेल्याच राजकीय विश्लेषणात पाहायला मिळतात. इतक्या की लेखकाचे मूळ हेतू निश्चित कोणते होते हे कोणीच सांगू शकत नाही.

Scanned with CamScanner

**डेव्हिड आप्टेर यांचे विचार :**

राजकीय विश्लेषणाच्या या वेगळ्या अंगाने व अधिक समावेशक पद्धतीने विचार डेव्हिड आप्टेर याने केला आहे. त्याच्या मते, सत्ता हा राज्यशास्त्राचा मुख्य अभ्यासविषय आहे. सत्ता कधीच अमूर्त तत्त्वांमधून उगम पावत नसते, तर व्यावहारिक (डिफरन्शियल) अशा संबंधांमधून ती अस्तित्वात येते. सत्तेचा संबंध केवळ नियमांशी (रूल्स) नसतो, तर भूमिकांशी (रोल्स) असतो. दैनंदिन जीवनात प्रत्येक जण पालक, कामगार, नोकर, इतर, राजकीय व तत्सम अशा ज्या अनेक भूमिका पार पाडत असतो त्यांच्याकडे पाहण्याचा त्याचा खाजगी तसाच सार्वजनिक दृष्टिकोनही असतो. इतर कोणत्याही निर्णयात्मक अभ्यासाप्रमाणे राजकीय विश्लेषणाचाही संबंध या सर्व संबंधांशी येतो.

राज्यशास्त्रज्ञाची तुलना रसायनशास्त्रज्ञाशी करून आप्टेर पुढे असे म्हणतो की रसायनशास्त्रज्ञ ज्याप्रमाणे मिश्रणाचे वेगवेगळे घटक किंवा मूलतत्त्वे वेगळी काढून व त्यांची भिन्न प्रकारे पुन्हा जोडणी करून विश्लेषण करतो त्याप्रमाणे राज्यशास्त्रज्ञही व्यक्तीच्या दैनिक जीवनाचे खाजगी व सार्वजनिक असे विघटन करतो आणि त्यांची वेगवेगळ्या पद्धतीने जोडणी करून अभ्यासतो यालाच राजकीय विश्लेषण म्हणता येते. म्हणून मूलघटकांच्या फेरजोडणीच्या आधारे नवे प्रश्न, नवे अभ्युपगम (हायपोथेसिस) आणि सिद्धान्त मांडणे अभ्यासकाला शक्य होते.

**राजकीय विश्लेषणाचे मुख्य विषय :**

विशिष्ट विश्लेषणाचे प्रश्न वा सिद्धान्तविषयक प्रश्न यापेक्षा विश्लेषणाच्या विषयांना डेव्हिड आप्टेर अधिक महत्त्व देतो. त्याच्या मते, विश्लेषण-पद्धती आणि सिद्धान्त यांचा एकत्रित विचार केल्यास अभ्यासात एकजिनसीपणा येतो. राजकीय विश्लेषण असे ज्याला म्हटले आहे त्याची उत्क्रांती ज्या सहा मुख्य परंपरांमधून वा विषयवस्तूंच्या आधारे झाली आहे त्यांना आप्टेरने अशी नावे दिली आहेत : राजकीय तत्त्वज्ञान, संस्थावाद, वर्तनवाद, बहुलवाद, संरचनावाद आणि विकासवाद. राज्यशास्त्राच्या अभ्यासवस्तूकडे पाहण्याचे हे विभिन्न दृष्टिकोनच आहेत.

**(१) राजकीय तत्त्वज्ञान :** मानवी व्यवहारांना विवेकाच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास तत्त्वज्ञान निष्पन्न होते. राज्यशास्त्राच्या अध्ययनाचा राजकीय तत्त्वज्ञानावर बऱ्याच काळापर्यंत मुख्य भर होता. राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रयोजनांवर आणि नैतिक साध्ये व हेतू यांच्यावर विशेष कटाक्ष होता. ग्रीकांनी तत्त्वज्ञानाच्या तत्त्वबोधांचा उपयोग न्यायाच्या व कायद्यापुढील समदृष्टीच्या (इक्विटी) प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी केला. उत्तरोत्तर त्या तत्त्वांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या प्रश्नाला महत्त्व येत गेले. तत्त्वज्ञानाचे रूपांतर व्यवहारात करण्यासाठी अनेक संस्था साकार झाल्या.

**(२) संस्थावाद (इन्स्टिट्यूशर्नेलिझम्) :** शासकीय व्यवहारातून तत्त्वज्ञानात्मक प्रयोजने प्रत्यक्षात आणण्याचे कार्य संस्था करतात. या अंमलबजावणीतूनच बव्हंशी अनुभववादी किंवा उपयोजित (ॲप्लाईड) राज्यशास्त्र उभे राहिले आहे. राजकीय साधनांचा वापर करून समाजजीवन

सुरळीत करण्याचे कार्य संस्था करतात. उदा. प्रातिनिधिक शासन ही लोकशाहीची संस्थात्मक पूर्वअट ठरते.

मात्र संस्थांना स्वतःचे स्वयंमेव असे अस्तित्व नसते. त्या व्यक्तींच्या मिळून होतात. शासकीय नियमांचे या व्यक्तींचे आपले स्वतंत्र निर्वचन असते. त्यांचे वर्तन संस्थांच्या व तत्त्वज्ञानांच्या चौकटीत कधीच सीमित राहू शकत नाही. प्रगत देशांतही लोकशाहीचे प्रयोग फसावेत, किंवा नाझींच्या काळात हुकूमशहांच्या आज्ञा पाळून लोकांनी अमानुष कृत्ये करावीत याचे स्पष्टीकरण संस्था वा तत्त्वज्ञाने देऊच शकत नाहीत. म्हणून तिसऱ्या अध्ययनप्रवाहाचा आधार घ्यावा लागतो.

**(३) वर्तनवाद (बिहेवियरॅलिझम्)** : व्यक्तीचा विचार एक राजकीय एकक (युनिट) म्हणून करून तिच्या वर्तनावर अध्ययनाचे लक्ष केंद्रित करणारा वर्तनवाद संस्थांच्या अभ्यासापेक्षा, लोक कसे वागतात ? आणि तसे वागण्यामागे कोणत्या प्रेरणा असतात ? या प्रश्नांना मध्यवर्ती मानतो. लोकांची मते व अग्रक्रम, त्यांना हिंसाप्रवृत्त करणारे घटक, इतरांच्या मतांविषयीची सहिष्णुता, त्यांची मते कशी बदलतात, ते केव्हा राजकीय सहभाग करतात व केव्हा त्याबाबत उदासीन राहतात, ते आपल्या हितसंबंधाचे संरक्षण कसे करतात, या सर्व घटकांचा राजकीय पक्षांशी वा पक्षगटांशी असलेल्या संबंधावर किंवा एकूणच राजकीय समूहजीवनावर कसा परिणाम होतो - अशा अनेक मुद्यांवर वर्तनवादी अभ्यास झाले आहेत.

**(४) बहुसत्तावाद (प्ल्यूरॅलिझम्)** : समाजातील विभिन्न समूहांचे परस्परांशी कसे स्पर्धात्मक व सहकार्यात्मक संबंध येतात, किंवा वेगवेगळ्या संघटनात्मक वर्तनांचे आंतरसंबंध कसे असतात आणि त्या संबंधाचा जगातील लोकशाही व्यवस्थेवर कसा परिणाम होतो याचा अभ्यास बहुसत्तावादांतर्गत केला जातो. त्यांचा मुख्य रोख विकासावर असतो. विकास कसा साधायचा, त्यावर नियंत्रण कसे ठेवायचे आणि त्याचे काय करायचे याचा त्यात विचार होतो.

बहुसत्तावाद व वर्तनवाद या राजकीय विश्लेषणाच्या दृष्टिकोनांवर टीकाकारांचा मुख्य आक्षेप असा असतो की राजकीय तत्त्वज्ञानाच्या परिणामांकडे ते दुर्लक्ष करतात; राजकारणात जसे दिसते तेच खरे मानून चालतात, खोलात जाऊन त्याचा शासनाच्या व्यापक हेतूंशी व अर्थांशी असलेला संबंध ते शोधीत नाहीत.

**(५) संरचनावाद (स्ट्रक्चरॅलिझम्)** : सामाजिक जीवनाची विभागणी अनेक भूमिकांमध्ये, वर्गांमध्ये व नियमित अन्योन्याश्रयाच्या (रेसिप्रोसिटी) मार्गांमध्ये करून व्यक्ती व समुदाय यांच्यातील संबंधाचा शोध संरचनावाद घेतो. या संबंधांना तो सत्तेचे निर्धारक मानतो.

**(६) विकासवाद (डेव्हलपमेन्टॅलिझम्)** : संरचनांवर बदलांचा परिणाम होत असतो. विकासवाद हा राज्यशास्त्रीय अध्ययनाचा एक उपयोजित दृष्टिकोन आहे. तो विकास, औद्योगीकरण व बदल आणि त्यांचा शासनाच्या रचनांवर व धोरणावर झालेला परिणाम अभ्यासतो. एकेका देशातील अंतर्गत प्रश्नांचा अभ्यास जसा यात येतो त्याचप्रमाणे पहिले व

(लोकशाही राष्ट्रे), दुसरे जग (समाजवादी राष्ट्रे) व तिसरे जग (विकसनशील राष्ट्रे) - यांच्यात जे सत्तासंघर्ष आढळतात त्यांचाही अभ्यास केला जातो.

विकासाची दिशा कोणती असावी ? आणि त्याची उद्दिष्टे काय असावीत ? या प्रश्नांची उत्तरे शोधू जाता आपल्याला पुन्हा राजकीय तत्त्वज्ञानाकडे यावेच लागते.

राजकीय विश्लेषणाच्या या सहा दृष्टिकोनांपैकी सर्वात महत्त्वाचे वाद एका बाजूने 'राजकीय तत्त्वज्ञान' व 'संस्थावाद' यांच्यात, तर दुसऱ्या बाजूने 'वर्तनवाद व संरचनावाद' यांच्यात उभे राहिले आहे. यातला कोणता दृष्टिकोन अधिक ''शास्त्रीय'' आहे हे वादाचे मुख्य कारण आहे. वादाच्या दोन्ही बाजूंच्या समर्थकांची संख्या नित्य वाढते आहे. आपल्याला इथे त्या वादांच्या तपशीलात जाण्याची गरज नाही. एवढे नमूद करणे पुरेसे आहे की त्या सर्व दृष्टिकोनांना उत्क्रांतीच्या धाग्याने परस्परांशी जोडणे अशक्य नाही. राजकीय तत्त्वज्ञान आणि संस्थावाद एकमेकांच्या बरेच जवळ आहेत कारण पारंपरिक राज्यशास्त्राला ते संयुक्तपणे आधारभूत ठरले आहेत. वर्तनवादाने त्यांच्यापासून तात्त्विक व पद्धतीत्मक पातळीवर तसेच अध्ययनाचे क्षेत्र व व्याप्ती याही बाबतीत फारकत घेतली. पण वर्तनवादाच्या मर्यादाही स्पष्ट झाल्या आहेत. वर्तनवाद व्यक्तीच्या वर्तनाचा (मतदान, राजकीय सहभाग वगैरे) अभ्यास करू शकतो पण व्यक्ती म्हणजे राज्यव्यवस्था नव्हे आणि व्यक्तीचे अग्रक्रम तपासून समुदायाच्या निर्णयांचे संपूर्ण स्पष्टीकरण मिळूच शकत नाही. पुढील प्रकरणात आपण वर्तनवादाची चर्चा अधिक विस्ताराने करू.

उत्क्रांतीच्या क्रमात या राजकीय विश्लेषणाच्या भिन्न दृष्टिकोनांना सलग बसवायचे तर, आप्टेर म्हणतो त्याप्रमाणे, लोकशाहीसाठी आवश्यक असलेल्या पूर्वअटींचा ऊहापोह राजकीय तत्त्वज्ञान करते; ज्या संस्थांद्वारे लोकशाही व्यवहारात आणणे शक्य होते त्यांचा विचार संस्थावादात होतो; लोकशाहीतील प्रत्यक्ष राजकीय जीवनाशी संबंधित 'कोण, काय, केव्हा आणि कसे' या प्रश्नांशी वर्तनवादाचा संबंध येतो; बहुसत्तावादातून सहभाग व उत्तरदायित्व यांचे स्पष्टीकरण मिळते. राजकीय वर्तन कसे निर्धारित होते हा प्रश्न संरचनावाद उपस्थित करतो; आणि विकासवाद बदल व परिवर्तन यावर लक्ष केंद्रित करतो - असे राजकीय विश्लेषणाचे स्वरूप होते.

प्रत्येक दृष्टिकोनाचे परिप्रेक्ष्य (पर्स्पेक्टिवज्) निराळे तशा त्यांच्या अध्ययनपद्धती अध्ययनक्षेत्रे व ज्यावर भर द्यायचे त्या बाजूही भिन्न आढळतात. राजकीय तत्त्वज्ञानाचा भर तर्कशास्त्रीय विश्लेषण, विचारांचा इतिहासक्रम व उत्तम समाजाचे नैतिक आधार यावर असतो. तर कायदा, संविधान, पक्ष, नोकरशाही वगैरेंचे भूतकालीन व विद्यमान स्वरूप यावर संस्थावाद लक्ष केंद्रित करतो. वर्तनवाद व्यक्तीच्या व समुदायाच्या पातळीवरची निर्णयप्रक्रिया तपाशीत असल्यामुळे प्रयोगात्मक पद्धतींचा त्यात अवलंब केला जातो आणि मतदार वर्तन, लोकमत, राजकीय मानसशास्त्र, संयुक्त आघाड्या अशा क्षेत्रांत संशोधन करतो. बहुसत्तावादाचा भर लोकशाही सहभागाच्या पद्धती व त्यांच्या प्रशिक्षणावर तसेच वर्तनावर होणारा परिणाम यावर असतो. सहभाग, विकेंद्रीकरण, जमातवाद, समुदाय-सत्ता या विषयांना त्यात प्राधान्य येते. संरचनावाद